# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 34) 15th October 2009 ( No : 12


## A G E N D A

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
**to be held at 12.00 noon on *SUNDAY, the***
***13th December, 2009 at***
**Yeshwant Mahavidyalaya**
**WARDHA**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association to be held at 12.00 noon on Sunday, the 13th December, 2009 at Yeshwant Mahavidyalaya, WARDHA, is as follows :-

### ITEM NO. 505 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

(A) **TO CONFIRM** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 10 th May, 2009 at Shri. Narendra Tidke College of Arts & Commerce, RAMTEK.

*Notes :- 1) Copy of the minutes is Circulated on pages 153 to 156 of 2009 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, are invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 10 th May, 2009 at Shri. Narendra Tidke College of Arts & Commerce, RAMTEK **vide No.CIM/27 Dated 30 th October, 2009 published on page 165 of 2009 NUTA Bulletin.***

### ITEM NO. 506 :
### *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**(A) TO CONSIDER** and to approve the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2009.

***Notes** : (i) The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year is circulated on page 162 of 2009 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

*(iii) If any honourable member has a querry, regarding the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account, he should make it, within a week from the date of posting of this Bulletin, to Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606, specifying the exact point on which he seeks information/ clarification. A copy of the querry also be sent to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.*

### ITEM NO. 507 :
### *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**To Note** the Statement no. 20 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2009.

***Note :** (i) Statement no.20 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2009, is circulated on page 163 of 2009 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2009, will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

### विषय क्रमांक ५०८ :
### *आंदोलन काळातील घटनाक्रमाचा अहवाल*

**(अ)** प्रा. डॉ. एकनाथ कठाळे, महासचिव व प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी, सहसचिव यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आंदोलनाच्या ठरावापासून तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या काळातील घटनाक्रमाचा प्रसृत केलेला अहवाल विचारात घेणे.

*(**Note**:- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आंदोलनाच्या ठरावापासून तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या काळातील घटनाक्रमाचा प्रा. डॉ. एकनाथ कठाळे, महासचिव व प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी, सहसचिव यांनी तयार केलेला अहवाल सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४१ वर प्रसृत केलेला आहे.)*

**(ब)** कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.डॉ. अनिल सोमवंशी हे **उपरोक्त प्रस्तावाला पुढील सुधारणा मांडतील** :-

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 01.11.2009**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/ resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the**
***13th December, 2009***
***at* Yeshwant Mahavidyalaya**
**WARDHA**

"या अहवालाच्या परिच्छेद ९ मध्ये "३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये जुन्या समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी सारखेच पे बँड प्रस्तावित असले तरी ग्रेड पे मध्ये फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या सरस आहेत." या मजकूरा ऐवजी पुढील मजकूर

## SCHEDULE IX (VIDE RULE 17 /1) :- TRUST REG. NO. F-1594

## NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Place : Nagpur * Taluka : Nagpur * : District Nagpur

## INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31st MARCH 2009

| EXPENDITURE | | Amount Rs. |
|---|---|---|
| **To Expenditure in respect of Properties** | | |
| Rate, taxes, cesses … … … … | | |
| Repairs and maintenance … … … | | |
| Building Maintenance … … … … | | |
| Insurance … … … … … … | | |
| Depreciation … … … … … … | | 9,416.93 |
| **Other expenses** (Sch 'G') | | |
| To Establishment expenses | | 56,363.00 |
| To Remuneration to trustees (in the case of a math) to the head of the math including his house hold expenditure, if any | | |
| To Electricity Expenses | | |
| To Audit fee … … … … … … … | | |
| To Contribution and fees | | |
| To Printing and Stationery … … … … | | 37,289.00 |
| **To amount Written of** | | |
| (a) Bad debts … … … … … … | | |
| (b) Loan Scholarship … … … … | | |
| (c) Irrecoverable rents… … … … | | |
| (d) Other items… … … … … | | |
| To Miscellaneous Expenses … … … | | |
| To Depreciation … … … | | |
| To Amount transferred to Reserve or Specific F. | | |
| **To Expenditure on objects of the trust** | | |
| (a) Religious … … … … … … … | | |
| (b) Educational (NUTA Bulletin) … | 302,221.00 | |
| Bulletin Postages Exp. … | 17,625.00 | 319,846.00 |
| (c) Medical Relief … … … … … … | | |
| (d) Relief of Poverty … … … … … | | |
| (e) Other Charitable objects … … … | | 23,778.00 |
| Surplus Carried over to B/S … … … … | | 278,745.07 |
| | | **725,438.00** |

| INCOME | Amount Rs. |
|---|---|
| **By House Rent** … … … … … | |
| **By Agriculture Income** … … … … | |
| **By Hospital Receipt** … … … … … | |
| **By land Rent** Accrued/Realised … … … | |
| **By Interst** | |
| On MIDS … | 456,677.00 |
| On QIDS … … | |
| On Loans | |
| On Bank account | 232,261.00 |
| **By Divident** … … … | |
| **By Donation** in cash or Kind … … … | 36,500.00 |
| **By Grants** … … … … … | |
| **By Income** from other sources … … | |
| **By Subscription & Membership** … … | |
| **By Profit** on sale of Investment … … … | |
| **By Transfers** from Reserve … … … | |
| | **725,438.00** |

**As per Our report of even date**

Trustee/Sd/-S.A.Tiwari
Trust Address : Nagpur
Date : 25th June 2009

For C.R.SAGDEO & CO
Chartered Accountants
sd/
**Partner**

## SCHEDULE VIII (VIDE RULE 17 /1) :- TRUST REG. NO. F-1594

## NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Place : Nagpur -- Taluka : Nagpur -- District : Nagpur

## BALANCE SHEET AS AT : 31ST MARCH 2009

| FUNDS & LIABILITIES | Amount Rs. | Amount Rs. |
|---|---|---|
| **1 TRUST FUND OR CORPUS** | | |
| **Life membership fee** | | |
| Balance as per Last B/S … | 5,656,645.32 | |
| Adjustment during the year … | 59,001.00 | 5,715,646.32 |
| **II OTHER EARMARKED FUND** | | |
| Depreciation Fund … … … | | |
| Sinking Fund … … … | | |
| Reserve Fund … … … | | |
| Any other Fund (Schedule 'A') | | 3,098,421.35 |
| **III LOANS Secured or unsecured** | | |
| From Trustees … … … | | |
| From Others … … … | | |
| **IV LIABILITIES** | | |
| As per schedule 'B' … … | | 2,731.00 |
| For expenses Audit fees payable | | |
| For advances … … … | | |
| For rent/ other deposits … … | | |
| For Sundry credit balances … | | |
| **V INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | |
| Balance as per Last B/S … … | (3,09,746.94) | |
| Less appropriation if any add/less :surplus/ deficit | 2,78,745.07 | |
| as per I/E Account … … | | (31,001.87) |
| **TOTAL RS.** | | **8,785,796.80** |

| PROPERTY & ASSETS | Amount RS. | Amount RS. |
|---|---|---|
| **I FIXED ASSETS** (Sch.C) | 80,721.01 | 71,304.08 |
| Less : Depriciation | 9,416.93 | |
| **II INVESTMENTS** (Sch.D) | | 8,225,671.00 |
| **III LOANS & ADVANCES** | | |
| Other Loans … … … | | |
| **B) Advances** (Sch.E) … … | | 20,696.64 |
| To trustess … … … | | |
| To employees … … … | | |
| To contractors … … … | | |
| To lawyers … … … | | |
| To Other TDS … … … | | |
| **IV INCOME OUTSTANDING** | | |
| House Rent … … … … | | |
| Land Rent … … … … | | |
| Interest … … … … … | | |
| Other Income … … … | | |
| **V CASH AND BANK BALANCES** | | |
| (a) Cash in hand | | |
| (b) Bank Balance (Sch.F) … … | | 468,125.08 |
| **TOTAL RS.** | | **8,785,796.80** |

The above Balance sheet to the best of my belief contains a true account of the Funds and Liabilities and Assets of the trust

Trustee:
S/d. S.A.Tiwari
Trust Address : Nagpur

Date : 25th June 2009

As per Our report of even date
For **C.R.SAGDEO & CO**
Chartered Accountants
Sd/- Partner

दाखल करण्यात यावा. :-

"३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये व राज्यशासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाने लागू केलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी काही ठिकाणी वेगवेगळे पे बँड योजिलेले आहेत, इतकेच नव्हे तर ग्रेड पे मध्ये सर्व ठिकाणी फार मोठे फरक असून त्या दोन्ही बाबतीत यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या सरस आहेत."

**विषय क्रमांक ७०९ :**

***अभिनंदन व धन्यवाद प्रस्ताव***

(अ) प्रा. अविनाश मोहरील हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

१. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्वाखाली दिनांक १४ जुलै २००९ पासून तर २६ ऑगस्ट २००९ पर्यंत एकूण ४४ दिवस चाललेल्या बेमुदत कामकाज बंद आंदोलनाचा भक्कम आधार महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी तसेच सर्व घटक संघटनांचे पदाधिकारी व नेते हे होते, ही आमची दृढ भावना आहे. आंदोलनाचे यशस्वीपणे नेतृत्त्व करतांना महासंघाच्या तसेच घटक संघटनांच्या पदाधिकारी व नेत्यांनी **बजावलेल्या कामगिरीबद्दल हे सभागृह अतीव समाधान व्यक्त करीत आहे.**

२. आंदोलनकर्त्यांचा आपल्या नेतृत्त्वावर असणारा दुर्दम्य विश्वास, आंदोलनाचे नेतृत्त्व करणारे व प्रत्यक्ष समोरासमोर आपले कौशल्य पणाला लावणारे वाटाघाटी चमुतील सर्व सदस्य आणि मैदानावरील लढाई लढताना सर्व सहकाऱ्यांचे मनोबल टिकवून ठेवणारे संघटनांचे पदाधिकारी या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे प्राध्यापकांच्या आंदोलनाची ही यशस्वी फलश्रुती होय. इतक्या योजनाबद्ध पद्धतीने व संपूर्णपणे कायद्याच्या चौकटीत राहून करण्यात आलेले अत्यंत शिस्तबद्ध असे हे आंदोलन ठरले, **इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासात नोंद व्हावी असेच या आंदोलनाचे स्वरुप होते.** यावेळी उभारलेला हा संघर्ष खऱ्या अर्थाने वेगळा व विशेष अशा स्वरुपाचा होता. मैदानावर येऊन केलेला संघर्ष, चर्चात्मक स्वरुपाचा संघर्ष यासोबतच यावेळी हा मानसिक पातळीवरही आव्हान देणारा होता, **या सर्व संघर्षामध्ये शेवटपर्यंत धैर्यपूर्वक टिकून राहीलेले आंदोलनकर्ते प्राध्यापक निःसंशयपणे धन्यवादाचे धनी आहेत.**

३. प्राध्यापक चळवळीने निर्माण केलेल्या एकसंघपणाला आव्हान देणारे अनेक मानसिक वार या आंदोलनादरम्यान करण्यात आले व **आंदोलन दडपून टाकण्याचाही प्रयत्न सर्व पातळीवरून करण्यात आला.** आंदोलनकर्त्यांशी प्रत्यक्ष आंदोलन सुरु होईपर्यंत **चर्चाच न करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय,** आंदोलन सुरु झाल्यावर व एकदा चर्चा सुरु झाल्यानंतर मतैक्य पत्र तयार करण्याची

## STATEMENT REGARDING THE FIXED SECURITIES OF THE ASSOCIATION AS ON 31ST MARCH, 2009.

## STATEMENT NO.20

**A) LIFE MEMBERS**

**1**. No.Of Members as on the day of Constitution amendement (9th May, 1976 i.e. to put membership fee in fixed deposits.)... **214**

**2.** Total No. of Members as on the Date (9th Oct. 1988) of increasing the L.M.fees from Rs. 151 to 501) ......... **2846**

**3.** No. of Members from 9th May 1976 to 9th Oct. 1988 (2-1) = (2846-214) =... **2632**

**4.** Total No. of Members as on the date (30th April 1991) of increasing the L.M. fees (from Rs. 501 to 2001) ... **3279**

**5.** No. of Members from 9th Oct. 1988 to 30th April 1991 (4-2)=(3279-2846)= ... **433**

**6.** Total No. of members as on the date (31st December 2000) of increasing the L.M.fees from (Rs. 2001 to 4001) ... 4723**7.** No. of Members from 30 April, 1991 to 31st March, 2002 (6-4) = (4723-3279) = ...**1444**

**8.** Total No. of members as on the date (30 th September 2006) of increasing the L.M.fees from (Rs. 4001 to 10001) ... **5195**

**9.** No. of Members from 1st January, 2001 to 31st March, 2008 (9-6) = (5195-4723) = ... **472**

**10.** Total No. of members as on 31st March 2009... **5201**

**11.** No. of memebers from 1st October 2006 to 31st March 2009... (10-8) (5201 - 5195) = **06**

**B) TEACHERS WHO MADE PART PAYMENT OF L.M.FEES**

**12.** i) D.No.of Teachers who have paid 1001/1000 ... 20

**13.** a) No.of Teachers who have paid 1001/1000 .......17

b) No.of Teachers who have paid 2001/2000 .......62

c) No.of Teachers who have paid 4001/4000....... 06

**C) AMOUNT OF L.M. FEES RECEIVED....Rupees**

**14.** Amount Received from Members mentioned at Sr.No.1 above Rs. ...... **00.00**

**15.**Amount Received from members at Sr.No.3 above (2632 x 151) ... ... **3,97,432.00**

**16.** Amount Received from members mentioned at Sr.No.5 above (433 x 501) ... ... **2,16,933.00**

**17.** Amount Received from members mentioned at Sr. No. 7 above. (1444 x 2001) ...... **28,89,444.00**

**18.** Amount Received from members mentioned at Sr. No. 9 above (472 x 4001) ... **18,88,472.00**

**19.** Amount Received from members mentioned at Sr. No.11 above (6 x 10001) ... **60,006.00**

**20.** Amount Received from members mentioned at Sr. No.12 & 13 above (20,020 +1,41,079 + 24,006)...**1,85,105.00**

**21.** Total amount of L.M.Fund received from all the members mentioned at Sr.No. 14 +15+16+17+18+19+20 above. and hence expected to have been invested in fixed Securities ....**56,36,392.00**

**D) TOTAL AMOUNT IN FIXED SECURTIES.**

**22.** Total amount invested in fixed securities (Details as per Appendix A & B ) (1,16,025 + 55,00,000 ) = **56,16,025.00**

**23.** Total Balance in life membership Ac. ( A/c.19893) ... **42,141.12**

**24.** Total amount in fixed Securities and cash in the Bank (22+23)... ... **56,58,166.12**

**25.** Amount of cheques under Realisation since they are deposited recently ......

**26.** Total of 24 and 25 above...... **56,58,166.12**

**27.** Surplus of 26 over 21 ... ... ... **21,774.12**

***APPENDIX* 'A'**

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2009

(See Item at Serial No.22 in the statement).

UNITS OF UNIT TRUST OF INDIA

(1) Sr. No. (2) Folio Certificate No.:- 526218293593 (3) No. of Units :- 9409.976 (4) Face Value of Each Unit :- 12.33 (5) Amount of Investment :- 1,16,025 (6) Date of Investment :- 25.2.2008 (7) Period of Investment :- 3 Years (8) Rate of Dividend :- Total : 1,16,025

***APPENDIX* 'B'**

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2009

(See Item at Serial No.22 in the statement).

BANK OF MAHARASHTRA,

MIDS SCHEMES

| Sr. No. | MIDS Certificate | Amount of Investment | Date of Investment | Period of Investment | Rate of interest |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 740698/1 | 25,00,000 | 20.09.2006 | 78 Months | 8.00% |
| 2. | 873695 | 20,00,000 | 02.08.2008 | 12 Months | 9.50% |
| 3. | 873305 | 10,00,000 | 08.05.2008 | 12 Months | 8.50% |
| **Total** | | **55,00,000** | | | |

**Date : 25th June 2009** **Dr. S. A.TIWARI**, Treasurer,

*Note :* Statement No.19 was printed on page 128 of 2008 NUTA Bulletin.

पूर्वपरंपरा बाजूला ठेवून **एकतर्फी पत्र** देण्याचा उच्च शिक्षण सचिवांनी लावलेला सपाटा, या सर्वांवर कडी म्हणजे आंदोलनकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी लक्षावधी रुपये खर्च करुन उच्च शिक्षण सचिवांनी **वृत्तपत्रात जाहिराती** देण्याचा लावलेला धडाका व तुम्ही कारवाई सुरु करा असे कुलगुरूंना **देण्यात आलेले लेखी आदेश हा या प्रयत्नाचाच भाग होता.** पण महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने घेतलेली अभ्यासपूर्ण ठाम भूमिका, घटक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी वाढविलेले मनोबल, आंदोलनकर्त्यांचा शेवटपर्यंत धैर्यपूर्वक सहभाग आणि आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सरांनी आंदोलन काळात आपल्या प्रत्येक लहान मोठ्या कृतीने दिलेला मजबूत आधार यामुळे **प्राध्यापकांचे हे आंदोलन अभूतपूर्व तर ठरलेच पण सन्मानपूर्वक यशस्वीही ठरले.**

४. प्राध्यापकांच्या न्याय्य मागण्यांबाबत संपूर्णपणे नकारात्मक भूमिका घेतलेल्या शासनकर्त्यांकडून सकारात्मक व सन्मानजनक न्याय मिळविणे व आंदोलन यशस्वी करणे हे एक मोठेच अग्निदिव्य होते. "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" असा धक्कादायक निर्णय लेखी कळविण्यात आला होता. राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या व ३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये जुन्या समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी सारखेच पे बँड प्रस्तावित असले तरी ग्रेड पे व ॲकेडेमिक ग्रेड पे मध्ये फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.ची श्रेणीवेतने सरस आहेत. शिवाय श्रेणीवाढीची बहूमुखी संधी हे यु.जी.सी. वेतनश्रेण्यांचे एक खुपच आकर्षक वैशिष्ट्य आहे, विद्यापीठ अनुदान आयोगाची CAS ही शासकीय कर्मचाऱ्यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. "अनुषंगिक लाभ राज्यशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." असे उच्च शिक्षण सचिवांनी लेखी कळविले, त्यांचा हा किती विषारी निर्णय होता, या नुसत्या कल्पनेनेसुद्धा आजही तीव्र संतापाची भावना अनेकांच्या मनामध्ये निर्माण होते. "**१९९१ नंतर लागलेल्या व नेट-सेट नसलेल्या सर्व शिक्षकांच्या नेमणूका ह्या बेकायदेशीर आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगातील कोणत्याही वेतनश्रेणीत टाकता येणार नाही.**" अशी भूमिका उच्च शिक्षण सचिवांनी घेतली होती, तशा तरतुदी त्यांनी १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयात टाकूनच ठेवल्या होत्या व तशा जाहिराती ते वृत्तपत्रांना देत होते. या व अशा सर्व मुद्यांबाबतची कपटकारस्थाने नेस्तनाबूत करुन या अग्निदिव्यातून तावून सुलाखून व सहीसलामत बाहेर पडण्याचे महत्वपूर्ण कार्य पार पाडण्याचे श्रेय शिक्षकांनी दाखविलेल्या एकजुटीला व आंदोलनातील भक्कम सहभागाला आहे. त्याचबरोबर सर्व प्राध्यापकांना एकसंघ ठेऊन, वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांचे मनोबल टिकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे घटक संघटनांचे सर्व पदाधिकारी, तसेच ज्यांनी या कामाचे नेतृत्त्व केले ते महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे पदाधिकारी व नेते हे सर्व हार्दिक अभिनंदनास पात्र आहेत. या सर्वांचे ही सभा मनापासून अभिनंदन करीत आहे व सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे **बजावलेल्या कामगिरीबद्दल हे सभागृह अतीव समाधान व्यक्त करीत आहे.**

**(ब)** कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.डॉ. प्रविण रघुवंशी हे **उपरोक्त प्रस्तावाला पुढील सुधारणा मांडतील** :-

"प्रा. अविनाश मोहरील यांनी मांडलेल्या ठरावाच्या परिच्छेद ४ मध्ये "३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये जुन्या समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी सारखेच पे बँड प्रस्तावित असले तरी ग्रेड पे व ॲकेडेमिक ग्रेड पे मध्ये फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.ची श्रेणी वेतने सरस आहेत." या मजकूरा ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा. :-

"३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये व राज्यशासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाने लागू केलेल्या वेतनश्रेण्यामध्ये समतुल्य वेतनश्रेण्यासाठी काही ठिकाणी वेगवेगळे पे बँड योजिलेले आहेत, इतकेच नव्हे तर ग्रेड पे व ॲकेडेमिक ग्रेड पे मध्ये सर्व ठिकाणी फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या (पे बँड) व श्रेणी वेतने सरस आहेत."

**विषय क्रमांक ७१० :**

***उपदानाची कमाल मर्यादा वाढविणेबाबत***

उपदानाची कमाल मर्यादा वाढविणेबाबत वित्त विभागाचा दिनांक २१ ऑगस्ट, २००९ रोजीचा शासन निर्णय क्रमांक सेनिवे-१००९/६९/सेवा-४ ची नोंद घेणे.

## उपदानाची कमाल मर्यादा वाढविणेबाबत

**महाराष्ट्र शासन : वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक सेनिवे-१००९/६९/सेवा-४**

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट, २००९**

**पहा** :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१००५/११५/सेवा-४, दिनांक १२ जून २००७ (२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१००९/३१/सेवा-४, दिनांक ५ मे २००९

**निर्णय**

सेवानिवृत्ती उपदान व मृत्यू उपदान यांच्यावरील कमाल मर्यादा दिनांक १ सप्टेंबर २००९ पासून रुपये ५.०० लाखांवरुन रुपये ७ लाखापर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२) लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारासह, लागू राहील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००९०८२११२४२०००१ असा आहे.

५. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(निलेश बा. वाडेकर)
शासनाचे उपसचिव

## TREASURER'S EXPLANATORY NOTE

### GIVING DETAILS OF EXPENDITURE ON ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2009

In the Income and Expenditure Account of the Audit Report for the year ended on 31st March 2009 an amount of Rs.56,363.00 is shown as expenditure towards **establishment expenses**. The General Body meeting of NUTA dated 15.4.79 while discussing the audit report for the year ending on 31st March 1978 had resolved (vide item no.(3) (c) on page no. 109 of 1979 **NUTA Bulletin**,) that "the treasurer will circulate a brief explanatory note regarding income and expenditure giving details of expenditure as far as possible along with financial statements hereinafter". Hence the details of the break up of establishment expenses are given here.

**ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2009**

| Particulars | Amount Rs.P. |
|---|---|
| Travelling Expenses | 500.00 |
| Telephone & Trunk Call | 9,421.00 |
| Meeting Expenses | 746.00 |
| Bank Commission | 344.00 |
| Postage | 2,092.00 |
| Affiliation Fees | 11,000.00 |
| Miscellenous Expenses | 11,885.00 |
| Clerks/Peon's Salary | 9,600.00 |
| Legal Expenses | 2,077.00 |
| Audit Fees | 5,618.00 |
| Repairs & Mnt. | 3,080.00 |
| Total | **56,363.00** |

25th June 2009

Sd. S. A. Tiwari
Treasurer,

# अंधश्रध्दा हानिकारक असते

**प्रा. बी.टी.देशमुख**, *विधानपरिषद सदस्य*

(१) **सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन सुधारणेच्या वेगवेगळ्या वेतन संरचना** : शासकीय कर्मचारी आणि विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक यांचेसाठी केंद्र शासनाने मान्य केलेल्या "सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यांची संरचना" वेगवेगळी आहे.

(२) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेली सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन संरचना** : दिनांक २४ मार्च २००८ रोजी मा. न्यायमुर्ती श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखालील सहाव्या वेतन आयोगाचा जो अहवाल "Report of the Sixth Central Pay Commission " सादर झाला. (*NB 2008 P 14*) त्यावर केंद्र शासनाने निर्णय घेतला व त्याबाबतचा शासन निर्णय (No.1/1/2008-IC) भारत सरकारच्या गॅझेट ऑफ इंडीया मध्ये (असाधारण) **२९ ऑगस्ट २००८ रोजी** प्रकाशित करण्यात आला. (*NB 2008 P 101*) त्या नुसार केंद्रातील शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणा लागू झाली. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना २७ फेब्रुवारी २००९ च्या राज्याच्या शासननिर्णयाने (*NB 2009 P 81*) सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. अशा रितीने न्या. श्रीकृष्ण आयोगाच्या शिफारशीवर, केंद्र शासनाच्या २९ ऑगस्ट २००८ च्या आदेशाच्या धर्तीवर, हकीम समिती मिसळून, २७ फेब्रुवारी २००९ च्या शासननिर्णयाने, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणेची संरचना लागू करण्यात आली. अशी ही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेली सुधारित वेतन संरचना तक्ता क्रमांक १ मध्ये दिलेली आहे. (लागू पुरती) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेली ही सुधारित वेतन संरचना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना कशी लागू झाली असती हे या तक्त्यामध्ये दर्शविलेले आहे.** तक्त्याच्या स्तंभ १ मध्ये अनुक्रम नंबर दिलेला असून स्तंभ दोन मध्ये विद्यमान वेतनश्रेणीतील पदनाम नमूद केलेले आहे. स्तंभ ३ मध्ये विद्यमान वेतनश्रेणी नमूद केली असून स्तंभ ४ व ५ मध्ये सुधारित वेतनश्रेणीतील अनुक्रमे पे बँड व ग्रेड पे नमूद केलेला आहे. ही संरचना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने २३ जुलै २००९ रोजी घेतला असे सचिवांनी कळविले तरी चळवळीच्या प्रयत्नामुळे त्यांना तो प्रत्यक्ष अमलात आणता आला नाही व त्यामुळे एक मोठे संकट टळले असेच म्हणावे लागेल.

(३) **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागु करण्यात आलेली सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन संरचना** : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत "Report of the Committee to Review the Pay Scales and Service Conditions of University and College Teachers, 2008" या विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या जी.के. चढ्ढा समितीचा अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३ ऑक्टोबर २००८ रोजी सादर झाला. (*NB 2008 P 133*) त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने ७ व ८ ऑक्टोबर २००८ च्या बैठकीत विचार करुन वेतन सुधार व्यवस्था केंद्र शासनाकडे पाठविली व त्यावर केंद्र शासनाचा "Scheme of revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following the revision of pay scales of Central Government Employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission." या मथळ्याचा शासन निर्णय ("GOVERNMENT OF INDIA Ministry of Human Resource Development Department of Higher EducationNo.1-32/2006-U.II/U.I(i)New Delhi,") दिनांक 31st December, 2008 रोजी निर्गमित झाला. (*NB 2009 P 17*) केंद्राच्या या शासननिर्णयाप्रमाणे केंद्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन सुधारणा लागू झाली व ती राज्यांनी लागू करावी असे कळविण्यात आले. अशा रितीने चढ्ढा समितीचा अहवाल विचारात घेऊन, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीवर, केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या ३१ डिसेंबर २००८ च्या आदेशावर आधारित महाराष्ट्र राज्यात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे आंदोलन सुरु असतांना काढण्यात आलेल्या १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाने वेतन सुधारणेची संरचना लागू करण्यात आली. **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना प्रत्यक्षात लागु करण्यात आलेली सुधारित वेतन संरचना खाली तक्ता क्रमांक २ मध्ये दिलेली आहे.** तक्त्याच्या स्तंभ १ मध्ये अनुक्रम नंबर दिलेला असून स्तंभ दोन मध्ये विद्यमान वेतनश्रेणीतील पदनाम नमूद केलेले आहे. स्तंभ ३ मध्ये विद्यमान वेतनश्रेणी नमूद केली असून स्तंभ ४ व ५ मध्ये सुधारित वेतनश्रेणीतील अनुक्रमे पे बँड व ग्रेड पे नमूद केलेला आहे. **हा तक्ता काळजीपूर्वक पाहिल्यास यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या शेवटी जशाच्या तशा महाराष्ट्रात लागू झाल्या हे चळवळीचे मोठे यश होय.**

(४) या दोनही वेगवेगळ्या व्यवस्था आहेत. त्यातील पे बँडस् वेगवेगळे आहेत, ग्रेड पे वेगवेगळे आहेत, या दोनही बाबतीत यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या (Pay Bands) व श्रेणी वेतने सरस आहेत. शिवाय पदोन्नतीच्या (CAS) संधीबरोबरच श्रेणी वेतनामध्ये वेळोवेळी होणारी वाढ हे युजीसी वेतनश्रेण्यांचे खुपच आकर्षक वैशिष्ट्य आहे.

(५) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी राज्य शासनाने याबाबतचा जो शासननिर्णय दिनांक २७ फेब्रुवारी २००९ रोजी निर्गमित केला. (*NB 2009 P 81*) त्या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये राज्य शासनाने मान्य केलेल्या सुधारित वेतन संरचनेचे स्वरुप नमूद केलेले आहे. १.१.१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या २३ वेतनश्रेण्यासाठीचे पे बँड व ग्रेड पे तक्ता क्र. ३.१ मध्ये दिलेले आहेत. **यामध्ये १४ (अ) वर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या ८०००-१३५०० या वेतनश्रेणीसाठी ९३००-३४८०० चा पे बँड व ५४०० हा ग्रेड पे मंजूर केलेला आहे.** सनदी अधिकाऱ्यांच्या (Group A entry) वेतनश्रेण्या केंद्र शासन ठरवित असल्यामुळे त्यांना मात्र ८०००-१३५०० या जुन्या वेतनश्रेणीसाठी १५६००-३९१०० हा पे बँड, ५४०० या ग्रेड पे सह लागु करण्यात आला आहे. **तीन वर्षे सेवा झालेल्या रीडरला किंवा सिलेक्शन ग्रेड लेक्चररला पे बँड तीन (१५६००-३९१००) मधून पे बँड ४ (३७४००-६७०००) मध्ये श्रेणीवृद्धीची संधी हे सुद्धा युजीसी योजनेचेच महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.**

(६) गुजराथ शासनाने काढलेला दिनांक ६ ऑक्टोबर २००९ चा शासन निर्णय काळजीपूर्वक पाहिला तर त्याच्या प्रस्तावनेतच असे नमूद करण्यात आले आहे की "**या शिक्षकांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यात यावा की युजीसी प्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करावा ही बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.**" या शासननिर्णयाच्या परिच्छेद १ मध्ये त्या शासनाने काय निर्णय घेतला हे पुढील शब्दात नमूद केले आहे. "**विचाराअंती राज्यातील शासकीय महाविद्यालये, विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्न अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकांना राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या केन्द्रीय सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार ..... वेतनश्रेण्या दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याबाबत .... आदेश देण्याचे ठरविले आहे.**"

(७) युजीसी वेतन श्रेण्यांच्या सरसतेबाबत केंद्रिय पातळीवर राजकीय नेतृत्त्वाने घेतलेले निर्णय सनदी अधिकाऱ्यांच्या पोटात खुपच खुपत असल्यामुळे

---

**No.CIM/ 27 : : Dated 30th October 2009**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 10th May, 2009 at Shri. Narendra Tidke College of Arts & Commerce, RAMTEK is circulated on pages 153 to 156 of 2009 NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Prof.E.H.Kathale, Secretary, NUTA, N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati. 444 604.

**- Dr. E.H. Kathale, *Secretary, NUTA***

एकमेकांच्या संपर्कात राहून त्यांनी राज्यात अम्मलबजावणी करतांना त्या वेतनश्रेण्यांना सुरुंग लावण्याचे संघटीत कारस्थान उभे केले असे दिसून येते. महाराष्ट्रात सुद्धा "**या शिक्षकांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यात यावा की यूजीसी प्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करावा**" असाच प्रश्न मंत्रिमंडळाच्या विचारासाठी ठेवण्यात आला होता. राज्याच्या मंत्रिमंडळाने याबाबत काय निर्णय घेतला हे खुद्द उच्च शिक्षण विभागाने दिनांक २४ जुलै २००९ रोजी पत्र लिहून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना कळविले ते पुढील शब्दात "राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै, २००९ रोजी विचार करुन **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" असा निर्णय घेतला तरी संघटीत शक्तीच्या प्रयत्नामुळे सचिवांना तो प्रत्यक्ष अमलात आणता आला नाही व त्यामुळे एक मोठेच संकट टळले असेच म्हणावे लागेल.

(८) सनदी अधिकाऱ्यांच्या मनात शिक्षकांविषयी असलेल्या या आकसाच्या पोटी उच्च शिक्षण सचिव यांचे एकूण वर्तन त्यांच्या पदाला शोभणारे नव्हते. ते महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी कसे वागलेत हा प्रश्न आपण बाजूला ठेवू. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी १६ ऑगस्ट २००९ रोजी त्यांच्या मंत्रालयातील दालनांत महासंघाला दुपारी २.०० वाजता चर्चेसाठी बोलाविले होते. मा. उच्च शिक्षण मंत्री, अर्थ व विधी विभागाचे सचिव व इतर सर्वजण वेळेवर उपस्थित होते. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यासह वेळेवर चर्चेला सुरुवात केली पण उच्च शिक्षण सचिव मात्र अनुपस्थित होते. ते काही मिनीटांच्या उशिराने सभेत आले व त्याबद्दल त्यांना सर्वासमक्ष मा. मुख्यमंत्र्याकडून 'बोलणी' ऐकावी (खावी) लागली. शासनातील राजकीय नेतृत्त्वाच्या प्रती नोकरशहा किती उद्धटपणाने वागू शकतो याची कमाल मर्यादा प्रदर्शित करणारे उच्च शिक्षण सचिवांचे वर्तन आंदोलनाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे २६ ऑगस्ट २००९ ला पहायला मिळाले. त्यादिवशी ११ वाजेपासून तर ३ वाजेपर्यंत चाललेल्या चर्चेचे नेतृत्व स्वतः मा. उच्च शिक्षणमंत्री करित होते पण या चर्चेत एकदासुद्धा, एक मिनिटासाठी सुद्धा उच्च शिक्षण सचिव उपस्थित राहीले नाहीत. शेवटी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना, मुख्य सचिवांना या कामी उच्च शिक्षण मंत्र्यांना मदत करण्यासाठी पाठवावे लागले.

(९) "**एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील.**" "**युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल.**" अशी स्पष्ट आश्वासने उच्च शिक्षण विभागामार्फत विधानपरिषदेत देण्यात आली होती. स्वतः मा. मुख्यमंत्र्यांनी १६ ऑगस्टला वर्षा बंगल्यावरील चर्चेमध्ये व २० ऑगस्टला मंत्रालयातील चर्चेमध्ये "आम्हाला युजीसीच्या वेतनश्रेण्या लागू करायच्या आहेत. त्याबाबत काही चूक झाली असेल तर ती आम्ही दुरुस्त करु." असे महासंघाला सांगितले होते. खुद्द उच्च शिक्षणमंत्री यांनी सुद्धा ती बाब वारंवार मान्य केली होती. असे असतांना शेवटच्या दिवसापर्यंत उच्च शिक्षण सचिव हे उद्धटपणाचे वर्तन सोडायला तयार नव्हते. हे त्यांच्या २६ ऑगस्टच्या उच्च शिक्षण मंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीतील शंभर टक्के अनुपस्थितीवरुन स्पष्टपणे दिसून येते. हा प्रश्न सामोपचाराने व चर्चेने मतैक्य होवून मिटला पाहिजे अशी तळमळीची इच्छा उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे यांच्या मनात नसती, तसेच मा. मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी १६ व २० ऑगस्टला २ बैठका घेवून व शेवटच्या दिवशी मा. मुख्यसचिवांना या चर्चेत उच्च शिक्षणमंत्र्यांना मदत करण्याची सूचना दिली नसती, **तर राजकीय नेतृत्त्वाचा पाडाव करुन शिरजोर होण्यात नोकरशाही यशस्वी झाली असती.** सनदी अधिकाऱ्यांच्यापेक्षा किंचित सरस वेतनश्रेण्या दिल्यामुळे अशा अधिकाऱ्यांच्या कपट कारस्थानावर मात करण्यात राजकीय नेतृत्त्वाने दिल्लीत जसे यश मिळविले तसेच ते मुंबईमध्ये सुद्धा मिळविले. म्हणूनच या आंदोलनाचे नेतृत्त्व करणाऱ्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मा. मुख्यमंत्र्यांचे व उच्च शिक्षणमंत्र्यांचे आभार मानणारा ठराव आंदोलन समाप्तीच्या वेळी एकमताने मंजूर केला.

(१०) "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" असे नमूद करणारे सचिवांचे २४ जुलै २००९ चे उपरोक्त पत्र मिळाले तेंव्हा आंदोलन सुरु होवून १० दिवस झाले होते. परिणामी आंदोलन आणखी तीव्र झाल्यानंतर पुढे विशेषतः जेलभरो आंदोलनानंतर याबाबतचे अनेक निर्णय सचिवांना बदलावे लागले. गुजराथमधील शब्दरचना व महाराष्ट्रातील शब्दरचना योगायोगाने एकसारखी नसून सनदी अधिकाऱ्यांच्या राष्ट्रीय संगनमतातून या शब्दरचनेमध्ये एकवाक्यता आली होती व येत होती, हे लक्षात न आल्याने अनेक अंधश्रध्दाळू व अतिभाविक लोक सहावा वेतन आयोग लागू झाला तरी आंदोलन विनाकारण चालु ठेवण्यात येत आहे, असा शंखध्वनी करीत होते. तो वेतन आयोग काळा आहे की गोरा आहे, सावळा आहे की पिवळा आहे, याची **मुळ कागदपत्रे न पहाता नुसता सहावा वेतन आयोग असा शब्द कानावर आल्याबरोबर शिक्षकांनी आंदोलन मागे घ्यायला हवे, अशी अपेक्षा करणे म्हणजे अंधश्रद्धेला खतपाणी घालणेच होय. अशी अपेक्षा करणाऱ्या अंध श्रद्धाळूंना अंधश्रद्धा हानिकारक असते एवढेच सांगावेसे वाटते.**

## तक्ता क्रमांक : १

### राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेली सुधारित वेतन संरचना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पुढील प्रमाणे लागू झाली असती.

| Sr. No | Designation | Pre-revised Pay Scales | Revised Pay Scales | |
|---|---|---|---|---|
| | | | Pay band | GP |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Lecturer | 8000-275-13500 | 9300-34800 | 5400 |
| 2. | Lecturer (Sr. Scale) | 10000-325-15200 | 15600-39100 | 6600 |
| 3. | Lecturer(SG) | 12000-420-18300 | 15600-39100 | 7600 |
| 4. | Reader | 12000-420-18300 | 15600-39100 | 7600 |
| 5. | Professor | 16400-450-22400 | 37400-67000 | 8900 |
| 6. | Principal UG | 12000-420-18300 | 15600-39100 | 7600 |
| 7. | Principal PG | 16400-450-20000 | 37400-67000 | 8900 |

**संदर्भ** :- (१) २९ ऑगस्ट २००८ चा केंद्र शासनाचा शासननिर्णय (No.1/1/2008-IC) भारत सरकारचे असाधारण राजपत्र भाग-१ सेक्शन १ पृष्ठ ३४, पहा (*NB 2008 P 17*) (२) महाराष्ट्र शासन वित्त विभागाचा २७ फेब्रुवारी २००९ च्या शासननिर्णयाचा (क्रमांक वेपूर-१२०९/प्र.क्र.२०/सेवा-९) परिच्छेद २ मधील तक्ता ३.१ पहा (*NB 2009 P 81*)

## तक्ता क्रमांक : २

### केंद्र शासनाच्या ३१ डिसेंबर २००८ च्या आदेशाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागु करण्यात आलेली (युजीसी) सुधारित वेतन संरचना

| Sr. No | Designation | Pre-revised Pay Scales | Revised Pay Scales | |
|---|---|---|---|---|
| | | | Pay band | AGP |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Lecturer | 8000-275-13500 | 15600-39100 | 6000 |
| 2 | Lecturer (Sr.Scale) | 10000-325-15200 | 15600-39100 | 7000 |
| 3 | Lecturer (SG) / Reader **( Not completed** | 12000-420- 18300 **3 years on 1.1.06)** | 15600-39100 | 8000 |
| 4 | Lecturer (SG) / Reader **(Completed** | 12000-420-18300 **3 years on 1.1.06)** | 37400-67000 | 9000 |
| 5 | Professor | 16400-22400 | 37400-67000 | 10000 |
| 6 | Principal UG | 12000-420- 18300 | 37400-67000 | 10000 |
| 7 | Principal PG | 16400-22400 | 37400-67000 | 10000 |

**संदर्भ** :- (१) ३१ डिसेंबर २००८ चा केंद्र शासनाचा शासननिर्णय (No.1-32/2006-U.II/U.I(i) पहा (*NB 2009 P 17*) (२) महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाचा १२ ऑगस्ट २००९ चा शासननिर्णय क्रमांक (No. NGC 2009/(243/09)-UNI 1) पहा (*NB 2009 P 123*)

*(मुळ गुजराथीतून असलेल्या शासननिर्णयाचा शब्दशः मराठी अनुवाद)*

***राज्यातील विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या शिक्षकांना केन्द्रीय सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन धोरण मंजूर करण्याबाबत.***

# गुजरात सरकार : शिक्षण विभाग

***शासननिर्णय क्रमांक एन.जी.सी. ११२००९/३७३४/ख : सचिवालय, गांधीनगर, दिनांक ६.१०.२००९***

**प्रस्तावना :-** (१) शिक्षण विभागाचा दिनांक ७.९.१९९८ चा ठराव क्रमांक एम.आय.एस./११९७/२२८३(९-९८) ख
(२) शिक्षण विभागाचा दिनांक २४.४.१९९९ चा ठराव क्रमांक एम.आय.एस./११९७/२२८३ (९-९८) ख
(३) भारत सरकारचे दिनांक ३१.१२.०८ पत्र क्रमांक १-३२-२००६ यू ११ - यू १(१)
(४) भारत सरकारचे दिनांक ४.६.२००९ चे पत्र क्रमांक एफ-३-१-२००९ यू-१
(५) वित्त विभागाचा दिनांक १२.२.२००९ चा ठराव क्रमांक पगार १००९-१- पगार अेकम (म)
(६) वित्त विभागाचा दिनांक २७.२.२००९ चा ठराव क्रमांक पगार १००९-६ पगार अेकम (म)
(७) वित्त विभागाचा दिनांक २७.२.२००९ चा ठराव क्रमांक पगार १००९-७ पगार अेकम (म)
(८) वित्त विभागाची दिनांक २७.२.२००९ ची अधिसूचना क्रमांक पगार १००९-२ पगार अेकम (म)
(९) वित्त विभागाचा दिनांक २०.३.२००९ चा ठराव क्रमांक पगार १००९-३ पगार अेकम (म)
(१०) उच्च शिक्षण कमिशनर कार्यालयाचे दिनांक २१.४.२००९ चे पत्र क्रमांक कवर/०९-१०-५१६१
(११) उच्च शिक्षण कमिशनर कार्यालयाचे दिनांक २०.६.२००९ चे पत्र क्रमांक कवर/०९-१०-६४८५
(१२) उच्च शिक्षण कमिशनर कार्यालयाचे दिनांक १०.८.२००९ चे पत्र क्रमांक कवर/२००९-१०-९४५७.

राज्यातील शासकीय महाविद्यालये, विद्यापीठे आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकांना प्रस्तावनेत नमूद केलेल्या दिनांक **७.९.९८ व २९.४.१९९९ च्या ठरावानुसार यूजीसी प्रमाणे वेतनश्रेण्या देण्याचे धोरण मंजूर करण्यात आले होते.** या कर्मचाऱ्यांना भारत सरकारने प्रस्तावनेत नमूद केलेल्या दिनांक ३१.१२.२००८ च्या पत्राप्रमाणे यूजीसीने मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या, स्केल-टू-स्केल, मंजूर करण्याचा प्रस्ताव उच्च शिक्षण कमिशनर कार्यालयाने प्रस्तावनेत नमूद केलेल्या दिनांक २१.४.२००९ व २०.६.२००९ तसेच १०.८.२००९ च्या पत्रान्वये सादर केला होता.

**या शिक्षकांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यात यावा की यूजीसी प्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करावा ही बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.**

## *परिशिष्ट १*

## *गुजरात सरकार : शिक्षण विभाग*

*शिक्षण विभागाच्या दिनांक ६.१०.२००९ च्या शासननिर्णय क्रमांक एन.जी.सी. ११२००९/३७४५/ख सोबतचे*
*परिशिष्ट १ ( परिच्छेद २ पहा)*

### *राज्यातील विद्यापीठे, शासकिय महाविद्यालये, अशासकिय अनुदानित महाविद्यालयाच्या शिक्षक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकांकरीता राज्य सरकारने मंजूर केलेल्या सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेण्या*

| अ. क्र. | पद (पदाचे नाव) | विद्यमान वेतणश्रेणी शि.वि.ना.ता. ७.९.९८ प्रमाणे (युजीसी प्रमाणे) | केंद्रिय सहाव्या वेतन आयोगा प्रमाणे मिळणाऱ्या वेतनश्रेण्या (ता.१.१.२००६ पासून) पे बॅन्ड | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **विद्यापीठे, शासकिय व अशासकीय अनूदानित महाविद्यालयाचे शिक्षक** | | | |
| १. | व्याख्याता | ८०००-२७५-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| २. | व्याख्याता (सिनि.स्केल) | १००००-३२५-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ३. | व्याख्याता (सिले. ग्रेड) | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४. | रिडर | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५. | प्रोफेसर | १६४००-४५०-२०००० ५००-२२४०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| ६. | प्राचार्य | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ७. | प्राचार्य (सिनी.स्केल) | १६४००-४५०-२०००० ५००-२२४०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| | **विद्यापीठाकरीता (पी.जी.महाविद्यालय)** | | | |
| अ. क्र. | पद (पदाचे नाव) | विद्यमान वेतणश्रेणी शि.वि.ना.ता. ७.९.९८ प्रमाणे (युजीसी प्रमाणे) | केंद्रिय सहाव्या वेतन आयोगा प्रमाणे मिळणाऱ्या वेतनश्रेण्या (ता.१.१.२००६ पासून) पे बॅन्ड | ग्रेड पे |
| ८. | लायब्ररीयन | १६४००-४५०-२०९०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| ९. | डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (शारीरिक शिक्षक) | १६४००-४५०-२०९०० ५००-२२४०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| १०. | डेप्यु.लायब्ररीयन | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ११. | डेप्यु. डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| १२. | असि. लायब्ररियन (सिले.ग्रेड) | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| १३. | असि.लायब्ररियन (सिनी.ग्रेड) | १००००-३२५-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| १४. | असि.लायब्ररियन | ८०००-२७५-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| १५. | असि.डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन(सिले.ग्रेड) | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| १६. | असि.डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (सिनि.ग्रेड) | १००००-३२५-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| १७. | असि.डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन | ८०००-२७५-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| | **महाविद्यालयाकरिता** | | | |
| १८. | लायब्ररीयन (सिले.ग्रेड) | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| १९. | लायब्ररीयन (सिनि.ग्रेड) | १००००-३२५-१५६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २०. | लायब्ररीयन | ८०००-२७५-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| २१. | डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (सिले.ग्रेड) | १२०००-४२०-१८३०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| २२. | डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (सिनि.ग्रेड) | १००००-३२५-१५६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २३. | डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन | ८०००-२७५-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० |

**ठराव**

**विचाराअंती राज्यातील शासकीय महाविद्यालये, विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न अशासकीय अनूदानित महाविद्यालयातील प्राध्यापक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकांना राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या केन्द्रीय सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार** (वित्त विभागाच्या दिनांक २७.२.२००९ अधिसूचना (क्रमांक (जी.अे.एन.) पि.जी.आर. १००९-२ पे सेल (एम) प्रमाणे स्केल-टू-स्केल) **वेतनश्रेण्या दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याबाबत खालील प्रमाणे आदेश देण्याचे ठरविले आहे.**

(२) सध्या या शिक्षकांना यूजीसी ने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे पगार देण्यात येतो. यापुढे खालील सेवाशर्तीच्या आधिन ठेऊन या शासननिर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये दाखविल्याप्रमाणे वेगवेगळ्या संवर्गातील शिक्षकांना त्या परिशिष्टाच्या स्तंभ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर करण्यात येत आहेत.

**(३) शर्ती**

(१) या शासननिर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये क्रमांक १ ते २३ वर दर्शविलेल्या संवर्गाशिवाय कोणत्याही अन्य संवर्गांना सुधारित वेतनाचा लाभ मिळणार नाही.

(२) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये तसेच अशासकीय अनूदानित महाविद्यालयातील ज्या प्रोफेसर व व्याख्यात्यांना फिक्स पगारावर कंत्राटी नेमण्यात आले असेल त्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू होणार नाही.

(३) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना, सरकारी परवानगी शिवाय कोणतेही रिक्त पदे भरता येणार नाही व त्यांना सहावा वेतन आयोग किंवा चढ्ढा कमिटीप्रमाणे पगार लागू करता येणार नाही.

(४) राज्यातील विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनूदानित महाविद्यालयात वर्तमान स्थितीत जेवढ्या जागा पूर्ण भरलेल्या आहेत त्यांनाच सहावा वेतन आयोगाचा लाभ देता येईल. त्या व्यतिरिक्त कोणत्याही पदाला सहाव्या वेतन आयोगाचा लाभ देता येणार नाही. नंतर विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांनी स्वतःच्या अधिकाराचा उपयोग करून केलेल्या कारवाईबाबत सर्वस्वी जबाबदारी व्हाईस चान्सलर व रजिस्ट्रारची राहील.

(५) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनूदानित महाविद्यालयांना सरकारच्या सेवा-शर्ती व नियमांचे काटेकोर पालन करावे लागेल.

(६) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये तसेच अशासकिय अनूदानित महाविद्यालयाच्या प्राध्यापक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे जीपीएफ चे खाते असणाऱ्यांना वर्ष २००९-१० या वित्तीय वर्षापासून त्यांचे पगारातील तफावतीची रक्कम पुढील पाच वर्षे त्यांच्या सामान्य भविष्यनिधी मध्ये जमा करण्यात येईल. तसेच जे सी.पी.एफ. योजने अंतर्गत आहेत अशांना वर्ष २००९-१० या वित्तिय वर्षापासून पुढील पाच वर्षे वार्षिक हप्त्यानुसार पगारातील तफावत नगदी देण्यात येईल.

(७) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये अशासकीय अनूदानित महाविद्यालये स्वतःच्या अधिकारात कोणतेही रिक्त पद भरू शकणार नाही व कर्मचाऱ्यांची भरती करू शकणार नाही. नव्या रिक्त पात्र जागेकरिता व त्याचे भरती करीता सरकारची पूर्व अनुमती घ्यावी लागेल. या अटींचे पालन न झाल्यास व्हाईस चान्सलर व रजिस्ट्रार यांना जबाबदार ठरविले जाईल.

(८) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये व अशासकीय अनूदानित महाविद्यालयांना सरकारच्या काटकसर धोरणाचा अवलंब करावा लागेल..

(९) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनूदानित महाविद्यालयांना सर्व प्राध्यापकांचे वेतन पे कमिशन आई.एफ. एम.एस. (IFMS) पद्धतीनेच फिक्स करावे लागेल. या करीता उच्च शिक्षण कमिश्नर कार्यालयाद्वारा संयुक्त शिक्षण इ.डी.पी. सेलच्या संपर्कात राहावे लागेल.

(१०) राज्य सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे पगार, भत्ते मंजूर केलेले आहेत त्याच प्रमाणे शिक्षकांना भत्ते मिळतील HRA/DA देखील त्याच प्रमाणे मंजूर करण्यात येतील.

(११) विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांना ठरावा सोबत असलेल्या नमुना १ प्रमाणे या आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याचे आत लिखित स्वरुपात पर्याय द्यावा लागेल. एकदा दिलेला पर्याय अंतिम समजला जाईल.

(१२) वित्त विभागाद्वारे वेळोवेळी काढलेल्या ठरावाचे व नियमांचे काटेकोर पालन करावे लागेल.

(१३) वेतन फिक्शेसन करिता वित्त विभाग ता. २७.२.२००९ ची अधिसूचना क्रमांक पगार १००९-२ पगार अेकम (एच) प्रमाणे फेरफार करून लागू केले जाईल.

(१४) परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेल्या जागा संवर्ग वरील प्राध्यापकांना वित्त विभाग ता. २०.३.२००९ च्या अनुसूचि ब प्रमाणे सर्व माहिती अचूक भरून रुजू करावे लागेल.

(१५) वरील होणारा सर्व खर्च २२०२-सामान्य-शिक्षण-०३ युनि.आणि उच्च शिक्षण-१०४ खाजगी महाविद्यालये व संस्थांना मिळणारी मदत एकत्रित झालेल्या फंडातून दिली जाईल.

(४) हे आदेश वित्त विभाग ता. २७.२.२००९ ची अधिसूचना क्रमांक (जि.एन.सी.) पी.जी.आर. १००९ पे सेल (एम) च्या फकरा -२ (२) च्या (क) ते (स) चे आधिन तसेच या विभागाच्या समान क्रमांकाच्या फाईलीवर वित्त विभागाच्या ता. १६.८.२००९ ला मिळालेल्या लेखी आदेशाने जाहीर करण्यात येत आहे.

गुजराथचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावांने

**व्हिक्टर मेकवान**
उप सचिव, शिक्षण विभाग

## नुटाच्या आमसभेच्या वेळी करावयाच्या व्यवस्थेसंबंधी सूचना

आमसभा ठरलेल्या वेळी म्हणजे बरोबर दुपारी १२.०० वाजता सुरु होत असते, हे लक्षात ठेऊनच एकूण व्यवस्था असावी. सभा सुरु होण्याच्या पूर्वीच्या एक तासात सर्व सदस्य आपापल्या सोबत आणलेल्या जेवणाच्या डब्यांचा एकमेकासोबत आस्वाद घेत असतांना त्यांच्या बसण्यासाठी बगीच्यात, झाडाखाली, सावलीत किंवा उन असल्यास खोल्यातून स्वच्छतायुक्त व्यवस्था व सोबत पिण्याच्या पाण्याची निट व्यवस्था ही आमसभेच्या आयोजकांनी करावी एवढीच याबाबत अपेक्षा असते. - **डॉ.एकनाथ कठाळे, सचिव, नुटा**

(PR : P 62 OF 2002 EX-FILE)

## RULES FOR PROPOSING AMENDMENTS

**(Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended (a) by leaving out a word or words or (b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or (c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**02.11.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,.....................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................